नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक १०/०८/२०२६ (सोमवार )

..................................................................................................


## मा. पालकमंत्री यांनी घेतली नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीसांच्या कामकाजाची तसेच आगामी सणोत्साबाबत आढावा बैठक नागपुर ग्रामीण पोलीसांचे केले कौतुक

आज दिनांक १०/०८/२०२६ रोजी मा. ना. श्री. चंद्रशेखर बावनकुळे, महसुल मंत्री तथा पालकमंत्री नागपूर जिल्हा यांनी पोलीस भवन नागपुर येथे नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीसांच्या कामकाजाबाबत तसेच आगामी सणोत्सवाबाबत आढावा बैठक घेतली. सदर बैठकीत मा.डॉ राजीव पोतदार, विधान परिषद सदस्य, मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा, सर्व उपविभागिय पोलीस अधिकारी आणि सर्व शाखा प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

नागपूर ग्रामीण हे राज्यातील असे एकमेव पोलीस घटक आहे ज्यांनी १०० दिवसांच्या तसेच १५० दिवसांच्या ई—गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमांतर्गत उत्कृष्ट कामगिरी केली आणि त्या बद्दल दोन्हीही पुरस्कार प्राप्त केले आहे. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल मा. पालकमंत्री महोदयांनी नागपूर ग्रामीण पोलीस दलाचे विशेष कौतुक केले. तसेच लोकाभिमुख,पारदर्शक आणि गतिमान पोलीस प्रशासनाच्या प्रभावी अंमलबजावणीबद्दल नागपूर ग्रामीण पोलीस दलाच्या कार्याचेही त्यांनी गौरवपूर्ण उल्लेख करून अभिनंदन केले.

**सणोत्सव बंदोबस्त/ उपाययोजनेंबाबत आढावा:—** मा. मंत्री महोदय यांनी आगामी येणाऱ्या स्वतंत्रदिन, जन्माष्टमी, गोपाळकाला, पोळा, गणेश, चतुर्थी(स्थापणा), अनंत चर्तुदशी (विर्सजन) तसेच ईद—ए—मिलाद या सणोत्सवाच्या कालावधीमध्ये कायदा व सुव्यवस्थेबाबत उपाययोजनेंचा आढावा घेतला.


**रस्ते अपघातात लक्षणीय घट :—** जानेवारी ते जुलै २०२६ मध्ये महाराष्ट्र राज्यात रस्ते अपघातांमध्ये घट नोंदविणाऱ्या जिल्ह्यांमध्ये नागपूर ग्रामीणचा सातत्याने पहिल्या पाच जिल्हयामध्ये समावेश असुन सातत्यपूर्ण व परिणामकारक रस्ते सुरक्षा उपाययोजनांमुळे सन २०२६ मध्ये रस्ते अपघातातील मृत्यूंच्या संख्येत २३ टक्के, तर एकूण रस्ते अपघातांमध्ये १८ टक्के घट नोंदविण्यात आली आहे. रस्ते अपघातांमध्ये आणखी प्रभावीपणे घट करण्यासाठी SaveLIFE Foundation यांच्या तांत्रिक सहकार्याने जुलै २०२६ पासून राबविण्यात येणाऱ्या Dynamic Enforcement Action Plan या अभिनव उपक्रमाचे सुध्दा मा. पालकमंत्री महोदयांनी विशेष कौतुक केले.




| UNIT | MONTH | TOTAL ACCIDENT RANK |
|---|---|---|
| NAGPUR RURAL | JAN TO FEB 2026 | 04 |
| | JAN TO MAR 2026 | 03 |
| | JAN TO APRIL 2026 | 03 |
| | JAN TO MAY 2026 | 04 |
| | JAN TO JUN 2026 | 02 |
| | JAN TO JULY 2026 | 02 |


**विशेष मोहीम राबवून अंमली पदार्थांविरोधात प्रभावी कारवाई :—**
सन २०२६ मध्ये मागील सहा महिन्यांत ५ कोटींचा अंमली पदार्थांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. अंमली पदार्थांच्या जप्त मुद्देमालाच्या मूल्यात तब्बल १००० टक्क्यांनी वाढ झाली आहे. **अंमली पदार्थ व्यवसायात सक्रीय ४ टोळीविरूध्द MCOCA आणि २ आरोपीविरूध्द एमपीडीए अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे.** अंमली पदार्थांची तस्करी व विक्री करणाऱ्यांविरुद्ध विशेष मोहीम अधिक तीव्र करून, अंमली पदार्थमुक्त नागपूर ग्रामीणच्या दिशेने प्रभावी पाऊल उचलण्यात आले आहे.


**गुन्हेगांरी नियंत्रण :—** नागपूर ग्रामीण जिल्हयामध्ये सन २०२५ च्या तुलनेत सन २०२६ मध्ये खुनाच्या गुन्हयांमध्ये ५४.५५ टक्के, चोरीच्या गुन्हयांमध्ये २९ टक्के मारहाणीच्या गुन्हयांमध्ये २५.३३ टक्के आणि विनयभंगाच्या गुन्हयांमध्ये २० टक्के घट नोंदविण्यात आली आहे. तसेच खुनाचा प्रयत्न, अपहरण यांसह विविध प्रकारच्या गुन्हयांमध्येही लक्षणीय घट झाली आहे.





**प्रभावी प्रतिबंधक कारवाई** :— गंभीर व संघटित गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी नागपूर ग्रामीण पोलिसांनी मोका **(MCOCA)** कायद्यान्वये कारवाईला विशेष गती दिली असून, सन २०२६ मध्ये जुलैपर्यंत ११ मोका प्रस्तावांमध्ये ५३ आरोपींविरुद्ध कारवाई करण्यात आली आहे. तसेच जेलमधून सुटका झालेल्या सराईत आरोपींवरही बारकाईने लक्ष ठेवून ३३ प्रतिबंधात्मक कारवाया करण्यात आल्या आहेत. त्यामुळे संभाव्य गुन्हेगारीला प्रतिबंध करण्यासाठी प्रतिबंधात्मक पोलीसिंग अधिक प्रभावी करण्यात आले आहे. **गोवंशीय जनावरांची कत्तलीच्या उद्देशाने तस्करी व अवैध वाहतूक करणाऱ्या संघटित टोळीविरुद्ध मोक्का (MCOCA) अंतर्गत कारवाई करणारा नागपूर ग्रामीण हा महाराष्ट्रातील पहिले घटक असुन या संघटित गुन्हेगारीविरोधात करण्यात आलेल्या या अभिनव व प्रभावी कारवाईबद्दल मा. पालकमंत्री महोदयांनी नागपूर ग्रामीण पोलिसांचे विशेष कौतुक केले.**

गुन्हेगारी प्रवृत्तीला आळा घालण्यासाठी MPDA अंतर्गत एकूण १९ प्रतिबंधात्मक कारवाया करण्यात आल्या असून, त्यामध्य धोकादायक व्यक्ती, दारूबंदी, जुगार, प्राणी अत्याचार, वाळू चोरी आणि अमली पदार्थांशी संबंधित प्रकरणांमध्ये कारवाई करण्यात आली आहे.








**सायबर गुन्हयांमध्ये प्रभावी कारवाई :— मा. पंतप्रधान, भारत यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित होणाऱ्या आगामी प्रगती** च्त्।ळ।ज्( च्तव ।दक बजपअम ळवअमतदंदबम ंदक ज्पउमसल प्उचसमउमदजंजपवद ) **उच्चस्तरीय बैठकीच्या पार्श्वभूमीवर नागपुर ग्रामीण जिल्ह्यात सायबर गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी महाराष्ट्र सायबर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येत असलेल्या कारवाईत १) म्युल बँक खातेदारांविरुद्ध कारवाई ,२) पीडित नागरिकांचे पैसे परत** डवदमल त्मेजवतंजपवद डवकनसम (डत्ड) **,३) ैलवह च्वतजंस)** द्वारे आक्षेपार्ह मजकूर बंद करणे, **यासह अनेक मृद्दयांवर नागपुर ग्रामीण पोलिसांनी उल्लेखनीय कामगिरी केली आहे.**




| Sr. No | Month | Rank |
|---|---|---|
| 1 | E-Zero Fir | 2 |
| 2 | MRM | 3 |
| 3 | GRM | 6 |
| 4 | SAHYOG | 1 |
| 5 | CIAR (SAMANVAY) | 3 |
| 6 | Cyber Hotspots | 5 |

**Dial ११२ कामगिरी** :— Dial ११२ सेवेमध्ये प्रतिसादाचा वेग लक्षणीयरीत्या सुधारला असून, एकूण प्रतिसाद वेळ जुलै २०२६ मध्ये ६ मिनिटे ०५ सेकंदांवर आला आहे. मागिल सहा महीन्यात नागपुर ग्रामीण पोलीस दलाचा हे सातत्याने पहील्या १० घटकांमध्ये समावेश आहे.




**GPS प्रणालीद्वारे प्रभावी पेट्रोलिंग** :— नागपूर ग्रामीण जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्यांच्या वाहनांना GPS Tracking System जोडण्यात आले असून, पोलीस वाहनांच्या हालचालींचे Live Monitoring केले जात आहे. या प्रणालीच्या माध्यमातून पेट्रोलिंग

करणाऱ्या वाहनांचे स्थान, मार्ग, थांबे व कव्हर केलेले अंतर यावर वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून प्रभावी देखरेख ठेवली जाते.यामुळे गुन्हेप्रवण व संवेदनशील भागांमध्ये पोलीस बंदोबस्ताचे नियोजन अधिक अचूकपणे करता येत असून, पेट्रोलिंगची कार्यक्षमता व पोलिसांची तत्परता वाढण्यास मदत झाली आहे.

**मा. पालकमंत्री महोदयांनी नागपूर ग्रामीण पोलिसांच्या उल्लेखनीय कामगिरीचे कौतुक करून, याच पद्धतीने सातत्यपूर्ण व प्रभावी कामगिरी पुढेही सुरू ठेवण्याच्या सूचना दिल्या. तसेच लोकाभिमुख, पारदर्शक व गतिमान पोलीस प्रशासनाच्या दिशेने अधिक प्रभावीपणे कार्य करण्याचे निर्देश दिले.**


महाराष्ट्र पोलीस


महाराष्ट्र पोलीस
पोलीस अधीक्षक
नागपूर ग्रामीण


पोलीस अधीक्षक
नागपूर ग्रामीण



# भारतीय विद्या भवनच्या ८८व्या सत्रातील प्रमाणपत्र वितरण समारंभात मा. हर्ष ए. पोद्दार यांचे विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन

दिनांक १०/०८/२०२६ रोजी भारतीय विद्या भवन्स्, नागपूर यांच्या वतीने आयोजित ८८व्या सत्रातील प्रमाणपत्र वितरण समारंभ भवनच्या भगवानदास पुरोहित ऑडिटोरियम, सिव्हिल लाईन्स, नागपूर येथे उत्साहात पार पडला. या कार्यक्रमास मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले.

यावेळी मा. हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी प्रमाणपत्र प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना त्यांनी शिक्षणासोबतच शिस्त, सातत्य, मेहनत, सकारात्मक विचारसरणी आणि समाजाप्रती असलेली जबाबदारी यांचे महत्त्व अधोरेखित केले. “ विद्यार्थ्यांनी केवळ प्रमाणपत्र मिळविण्यापुरते शिक्षण न घेता, आपल्या ज्ञानाचा आणि कौशल्यांचा उपयोग समाजाच्या विकासासाठी व देशाच्या प्रगतीसाठी करावा” असे आवाहन त्यांनी यावेळी केले. तसेच बदलत्या काळानुसार विद्यार्थ्यांनी नवीन तंत्रज्ञान आत्मसात करून स्वत:मध्ये सातत्याने कौशल्यविकास घडवून आणावा, असेही त्यांनी सांगितले. आव्हानांना संधी मानून आत्मविश्वासाने पुढे जाण्याचा संदेश त्यांनी विद्यार्थ्यांना दिला.

यावेळी मा. श्री. हर्ष ए. पोद्दार यांनी विद्यार्थ्यांसोबत वर्गात बसून आपुलकीने व मनमोकळेपणाने संवाद साधला. तसेच चिमुकल्या विद्यार्थ्यांमध्ये मिसळून त्यांच्याशी आपुलकीने व मनमोकळेपणाने संवाद साधला. त्यांच्या अभ्यासाबाबत, आवडी–निवडी व भविष्यातील स्वप्नांबाबत जाणून घेत विद्यार्थ्यांना प्रेमळ संवादातून शिकण्याची, मेहनत करण्याची आणि मोठी स्वप्ने पाहण्याची प्रेरणा दिली.


Bharatiya Vidya
Bhavan
NAGPUR KENDRA
GANDHI INSTITUTE OF COMPUTER EDUCATION


Bharatiya Vidya
Bhavan
NAGPUR KENDRA
GANDHI INSTITUTE OF COMPUTER EDUCATION
& INFORMATION TECHNOLOGY,
NAGPUR CENTRE
CERTIFICATE DISTRIBUTION CEREMONY
SESSION 88 (APRIL 2026 TO JUNE 2026)




Where You Learn



# दुचाकी चोरीचे ९ गुन्हे उघड, १ आरोपी अटक
# १२ दुचाकी ; ५ लाख ३५ हजारांचा मुद्देमाल जप्त
# मौदा पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन मौदा** :— मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा ,श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री संतोष गायकवाड, उपविभागिय पोलीस अधिकारी, कन्हान उपविभाग यांच्या मार्गदर्शनात दिनांक ०९/०८/२०२६ रोजी मौदा पोलीसांनी दुचाकी चोरीचे ९ गुन्हे उघड करून एकुण १२ दुचाकी जप्त करत एका आरोपीला अटक केले आहे.

पोलीस स्टेशन मौदा अंतर्गत दाखल अउघड गुन्हयाचा तपास करीत असतांना मौदा पोलीस स्टेशनचे गुन्हे शोध पथकाचे अधिकार आणि अंमलदार यांनी गुप्त बातमीदार आणि तांत्रिक पुराव्याच्या आधारे आरोपी **प्रवेश कन्हैया कंगाले, वय ३८ वर्षे, रा. पोलीस लाईन टाकळी, गिट्टीखदान, नागपूर** याला निष्पन्न केले. दिनांक ०९/०८/२०२६ रोजी आरोपी माथनी टोलनाका परीसर ताब्यात घेवुन त्यास सदर गुन्हयात अटक करुन आरोपीकडे कौशल्यपुर्ण विचारपुस केली असता त्याने वर नमुद पोलीस स्टेशन मौदा व्यतिरीक्त, नागपुर ग्रामीण ,नागपुर शहर आणि भंडारा जिल्हयात सुध्दा दुचाकी चोरीचे गुन्हे केल्याची माहीती दिली. पोलीसांनी पंचासमक्ष आरोपीने विविध गुन्हयात चोरी **एकूण १२ मोटारसायकली, किंमती ५,३५,०००/— रूपयांचा** मुद्देमाल जप्त केला आहे.

**उघडकीस आलेले गुन्हे**

१.पोलीस स्टेशन मौदा अप क्रं ५३४/२६ कलम ३०३(२) भान्यासं

२.पोलीस स्टेशन मौदा अप क्रं ५३७/२६ कलम ३०३(२) भान्यासं

३.पोलीस स्टेशन मौदा अप क्रं ५३८/२६ कलम ३०३(२) भान्यासं

४.पोलीस स्टेशन मौदा अप क्रं ४०१/२६ कलम ३०३(२) भान्यासं

५. पोलीस स्टेशन सीताबर्डी अप क्रं ४९२/२६ कलम ३०३(२) भान्यासं

६. पोलीस स्टेशन खापरखेडा  अप क्रं  ४८१/२६ कलम ३०३(२) भान्यासं

७. पोलीस स्टेशन कोराडी  अप क्रं  ३२३/२६ कलम ३०३(२) भान्यासं

८. पोलीस स्टेशन  कोतवाली  कलम ३०३(२) भान्यासं

९. पोलीस स्टेशन नंदनवन कलम ३०३(२) भान्यासं



# अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या ०४ आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद, ०५ लाख ४६ हजार ४५० रूपयांचा मुद्देमाल जप्त
# अरोली पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन अरोली** :— दिनांक ०९/०८/२०२६ रोजी अरोली पोलीसांना गुप्त बातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, मौजा मोरगाव येथे काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे अरोली पोलीस घटनास्थळी पोहचले असता, नमुद घटनास्थळी काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळताना दिसुन आले. पोलीसांनी **आरोपी नामे १) भगवान भोजराज सपाटे, वय ५० वर्षे, रा. वाकेश्वर २) भोला बिसराम कुंभारे, वय ६२ वर्षे, रा. वाकेश्वर ३) चंद्रकुमार टेकचंद कुनभरे, वय ३५ वर्षे, रा. सिरसोली ४) गिरीधारी/अविनास श्यामराव नागपूरे, वय ३५ वर्षे, रा. ईजनी, सर्व ता. मौदा, जि. नागपूर** यांना ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळताना जागीच पकडले. पोलीसांनी घटनास्थळावरून ५२ तासपत्ते आणि १) रोख रक्कम १४००/— रूपये २) हीरो होंडा ग्लॅमर मोटरसायकल क्र. एम एच —४०/डी —७५३२ किंमती २०,०००/— रू २) हीरो स्प्लेंडर मोटरसायकल क्र. एम एच —४०/ए यू ४३४९ किंमती २५,०००/— रू ३) एक पांढऱ्या रंगाची महींद्रा स्कार्पिओ क्र एम एच—२१/ए एच ९३३३ किंमती ५,००,०००/— रूपये असा एकुण ५,४६,४५०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

**नमुद ०४ आरोपीतांविरूद्ध पोलीस स्टेशन अरोली येथे कलम १२ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**



# अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या ०६ आरोपीतांविरूध्द एन.डी.पी.एस कायदयान्वये गुन्हा नोंद

मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण आणि श्री. अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक ०९/०८/२०२६ रोजी नागपूर ग्रामीण जिल्हयात विशेष मोहिम राबवुन अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या ०६ आरोपीतांवर कलम २७ एन. डी. पी. एस कायदयान्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन उमरेड** अंतर्गत आरोपी १) मोहम्मद फैयाज शेख, वय २२ वर्ष, रा. मोमीनपुरा टिमकी नागपूर २) सौम्य दीपक बघेल, वय २० वर्ष, रा. मोमीनपुरा टिमकी नागपूर ३) मोहम्मद शाहिद अंसारी, वय २५ वर्ष, रा. मोमीनपुरा टिमकी नागपूर हे मकरधोकडा तलाव उमरेड येथे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आले. **पोलीस स्टेशन देवलापार** अंतर्गत आरोपी १) शेख सदाम शेख अकबर, वय ३० वर्ष, रा. आंबेडकर नगरचे समोर इदगाह बोरीयापुरा नागपूर २) रोशन खान रहमद उल्लाह खान, वय २६ वर्षे, रा. आंबेडकर भवन रोड मोमीनपुरा महात्मा फुले बाजार नागपूर ३) मोहम्मद रजा खान मोहम्मद फारूक खान, वय २५ वर्ष, रा. ईदगाह जवळ मोमीनपुरा बोरीयापूरा नागपूर हे मौजा डोंगरताल दर्गा शिवार येथे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आले.

# अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणाऱ्या तसेच सेवन करणाऱ्याआरोपीतांविरूद्ध ०५ गुन्हे नोंद

दिनांक ०९/०८/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू, मोहाफुल दारू असा एकुण २२६०/— रूपयांचा मुद्‌देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण ०५ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन काटोल** येथे आरोपी नामे १) देविदास नत्थुजी सोमकुवर, वय ५१ वर्ष, रा. लाखोळी, ता. काटोल २) महिला आरोपी यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन नरखेड** येथे आरोपी नामे देविदास लक्ष्मण मरस्कोल्हे, वय ३४ वर्ष, रा. गोंडेगाव ता. नरखेड याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन भिवापूर** येथे आरोपी नामे सोनू रक्षाबंधन रडके, वय २६ वर्ष, रा. सिद्धार्थ नगर भिवापूर, ता. भिवापूर, जि. नागपूर याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन उमरेड** येथे आरोपी नामे भोजराज चिमन राठोड, वय ८० वर्ष, रा. मांडवा लभान, ता. भिवापूर याचेवर ०१ गुन्हा नोंद.

**नमुद कारवाईत एकुण २७०० मिली देशी दारू, १५ लिटर मोहाफुल दारू असा एकुण २२६०/— रूपयांचा मुद्‌देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्‌देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने